**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक २२/२०२०** **दिनांक १७/०३/२०२०** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ११/०३/२०२० ते १७/०३/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १८/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून २२/०३/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११/०३ | १२/०३ | १३/०३ | १४/०३ | १५/०३ | १६/०३ | १७/०३ | | १८/०३ | १९/०३ | २०/०३ | २१/०३ | २२/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| २९.४ | २९.० | २८.४ | २९.८ | ३३.० | ३६.४ | ३४.४ | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३० | ३० | २९ | २९ |
| १८.६ | १७.६ | १५.८ | १५.८ | १९.६ | १८.८ | १८.४ | **किमान तापमान (अं.से)** | २१ | २१ | २० | २० | १९ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | २ | १ | १ | १ | ० |
| ६९ | ७१ | ६७ | ६२ | ५५ | ५६ | ५९ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५६ | ५७ | ५७ | ६० | ६० |
| ५० | ४५ | ४४ | ४० | ३७ | ४२ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ४० | ४० | ४२ | ४२ | ४५ |
| ३.१ | ३.३ | ४.३ | ५.३ | ७.३ | ४.९ | ३.२ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ४ | ४ | ३ | ३ | ३ |
| इ.पु. | इ.उ. | इ.उ. | द. | इ.उ. | वा.उ. | द. | **वाऱ्याची दिशा** | इ.पु. | आ.द. | नै.प. | आ. | इ.पु. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | **४२३३.४** |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १८ ते २२ मार्च २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता असून आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **पोटरी अवस्था** | • उन्हाळी भात पिक पोटरी अवस्थेत असताना भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें. मी. पर्यंत खेळती राहील अशी व्यवस्था करावी. |
| **वाल** | **काढणी अवस्था** | • वाल पिकाची काढणी जसजशा शेंगा वाळतील तसतशी शेंगांची तोडणी करून ४ ते ५ दिवस शेंगा उन्हात वाळवाव्यात व मळणी करावी किंवा शेंगा झाडावर वाळल्यानंतर पिकाची कापणी करून झाडे खळ्यावर ३ ते ४ दिवस उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठववणूकीमध्ये भुंग्याचा उपद्रव टाळण्यासाठी वालाचे दाणे मातीच्या खळीचा थर देऊन चांगले वाळवावे. |
| **आंबा** | **फळधारणा** | • आंबा पिकामध्ये उशिराने येत असलेल्या नवीन पालवीवर तुडतुड्याचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने पालवीचे तुडतुड्यापासून संरक्षण करण्याकरिता लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये (वाटाणा अवस्था), फळगळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाण्याच्या पाळ्या दयाव्यात तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• उत्पादन व फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना करावी.<br>• फळे गोटी ते अंडाकृती आकाराची असताना डॉ.बा.सा.कों.कृ.विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार फळगळ कमी करण्यासाठी, फळाचा आकार व वजन वाढून डाग विरहीत फळांसाठी, फळामधील साक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० सें.मी. आकाराची कागदी पिशवी लावावी. |
| **काजू** | **फुलोरा ते फळधारणा अवस्था** | • काजू पिकामध्ये उशिराने येत असलेल्या नवीन पालवीवर ढेकण्याचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडीपासून संरक्षण करण्याकरिता मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• हवामान पुर्वानुमानानुसार मोहोर अवस्थेत असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडींच्या वाढीसाठी हवामान अनुकूल दिसत असल्याने या किडींच्या बंदोबस्तासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फळधारणा झालेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत)<br>• काजू बिया पूर्ण तयार झाल्यावरच बियांची काढणी करावी. काढणी केलेल्या बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवून साठवणूक करावी. |
| **नारळ** | **-** | • तापमानात वाढ संभवत असल्याने नारळ बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. नवीन लागवड |

| | | |
|---|---|---|
| | | केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी. |
| **चिकू** | **फुलोरा ते फळधारणा** | • तापमानात वाढ संभवत असल्याने चिकू बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• चिकू पिकावर बी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी बागेची स्वच्छता करून प्रोफेनोफोस ५० टक्के प्रवाही १५ मि. ली. किंवा इंडोक्झाकार्ब १४.५ टक्के प्रवाही ५ मि.ली किंवा नोव्हल्युरोन १० टक्के प्रवाही ५ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. फवारणी पूर्वी तयार फळांची काढणी करावी. |
| **वांगी** | **फळधारणा** | • वांगी पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंडे व फळे जमा करून नष्ट करावीत व फेनव्हलरेट १० मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **भेंडी** | **फळधारणा** | • उन्हाळी भेंडी पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास किडग्रस्त फळे नष्ट करावीत व नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |